# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

राष्ट्रीय सेवा योजना

सूर्यदत्ता कॉलेज

## सूर्यदत्ता कॉलेज ऑफ मॅनेज्मेंट इन्फर्मेशन रिसर्च अँड टेक्नालॉजी
## बावधन, पुणे - २१.
## संयुक्त विद्यमाने आयोजित
## रा. से .यो विशेष शिबीर अहवाल

# उद्‌घाटन समारंभ




राष्ट्रीय सेवा **योजनेच्या** श्रमदान शिबिरात एकूण ५ मुली व २० मुले सहभागी होती. (सूर्यदत्ता कॉलेज ऑफ मॅनेज्मेंट इन्फर्मेशन रिसर्च अँड टेक्नालॉजी) या कॉलेजच्या मुख्याध्यापिका सौ. वंदना मल्होत्रा व उपमुख्याध्यापक श्री. दिपक सिंग यांच्या उपस्थित ७ दिवसांच्या श्रमदान शिबीरास उत्साहपूर्वक सुरवात करण्यात आली.



श्रमदान शिबिरात राबवण्यात आलेल्या कामांचा आढावा व तपशील पुढीलप्रमाणेः-

# ***स्वच्छ भारत अभियान***

यामध्ये मुलांनी कचरा विरहित गावाची संकल्पना मांडली. गावातील घन कचरा त्याबरोबरच प्लॉस्टिक कचरा गोळा करून त्याची नीट व्हिलेवाट लावली.





# स्वच्छता गृह, मंदिर परिसर व शाळा यांची स्वच्छता








सर्व स्वयंसेवकांनी मिळून पूर्व माध्यमिक शाळा, माध्यमिक शाळा, मुलींची शाळा, मैदान स्वच्छता, बाग व्यवस्थापन, शाळेतील सांडपाणी व्यवस्थापन, उद्यान सुशोभीकरण, शाळेतील झाडांना विटांचे आळे, मैदान समतोलीकरण, झाडांची सुरक्षा इत्यादी कामे पार पाडली. शाळेतील सर्व स्वच्छता गृह केमिकल-स्पिरीट टाकून नीट साफ केले. मंदिराचा गाभारा, छत, स्वच्छता गृह, अंगण या सर्व परिसराची स्वच्छता केली. या शिबारा दरम्यान वेगवेगळ्या दिवशी नियोजन करून वरील विविध कामे कार्यकुशलतेने करण्यात आली.

# ***रस्ता सुरक्षा अभियान***

मुलांनी रस्ता सुरक्षा या विषयावर पोस्टर बनवून, लोकांमध्ये जनजागृती केली. गाडी चालवताना हेल्मेट घालणे,सीट बेल्ट लावणे, हे किती महत्त्वाचे आहे हे पटवून दिले. तसेच वेग मर्यादा किती असावी ,वाहतूकीचे नियम याबददल जनजागृती केली. त्यानंतर प्रत्यक्ष रस्त्यावर जाऊन वाहतुकीचे नियंत्रण केले. शाळेतील लहान मुलांना तसेच वृध लोकांना रस्ता ओलांडण्यास मदत केली. रोडच्या कडेला मोठे दगड ठेऊन त्याना चुना लावून रोड मार्किंग करण्यात आली.




SLOW DOWN AROUND SCHOOL!
DON'T DRINK AND DRIVE
SAFETY ISN'T A SLOGAN IT'S A WAY OF LIFE
BUCKLE UP NEXT MILLION MILES
सूर्यदत्त कॉलेज ऑफ
मॅनेजमेंट इनफरमेशन रिसर्च अँण्ड टेक्नोलॉजी
(SCMIRT)
रस्ता सुरक्षा अभियान
राष्ट्रीय सेवा योजना


शिव कृपा
कलेक्शन
श्रीश मोबाईल शॉपी
श्री गणेश मंदिर
XEROX
VIDEOCON d2h
MH 12 DY 7059





# <u>*ग्रामसभा*</u>







<u>गावाचे</u> सरपंच, उपचरपंच, सदस्यांनी ग्रामपंचायत मध्ये रा.से.य़ो. स्वयंसेवकां सोबत सभा घेतली. या सभेंमध्ये ग्रामपंचायतीचा कारभार कसा चालतो. अंतर्गत विविध समित्या बदद्ल माहिती दिली व कायदा सेवा अधिकारा अंतर्गत येणाऱ्या कार्यसूची तसेच कार्याची माहिती दिली आणि मुलांच्या अनेक प्रश्नांना उत्तरे दिली. गावाला मिळालेल्या पुरस्कार बदद्ल माहिती दिली. ते खालील प्रमाणे :-

- तंटा मुक्ती पुरस्कार
- निर्मल ग्राम पुरस्कार
- संत गाडगे बाबा ग्रामस्वच्छता पुरस्कार
- पर्यावरण संतुलित ग्राम योजना
- ISO मानांकीतआदर्श ग्रामपंचायत

# ***स्त्री जन्माचे स्वागत करूया***

## *लेक लाडकी अभियान*




लेक लाडकी आणि लेक वाचावा लेक शिकवा या अभियानामध्ये स्त्री-भ्रूण हत्या विरोधी मुलांनी पोस्टर बनवून रॅली काढून लोकांमध्ये जनजागृती केली. गावातील लोकांमध्ये मुला- मुलींमध्ये भेदभाव न करता मुलीच्या जन्माचे पण स्वागत

करून तिला पण शिकवून तिच्या पायावर उभी करा. याबदद्ल जनजागृती करण्यात आली.




# ***सांस्कृतिक कार्यक्रम***

जि.प. शाळा, प्राथमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा आणि ज्युनिअर कॉलेज येथिल मुला-मुलींच्या समोर व्यसन मुक्ती अभियान , लेक वाचवा लेक शिकवा या विषयावर रा.से.य़ो. स्वयंसेवकांनी पथनाट्य, तसेच त्यावरील गाणी सादर करण्यात आली.



# <u>वृक्षारोपण व संवर्धन</u>





गावातील छोट्या टेकड्यांवर व त्यांच्या पायथ्याशी वृक्षारोपण केले तसेच इतर झाडांना पाणी जिरावे म्हणून खड्डे खोदून आळे तयार करण्यात आले. स्वयंसेवकांच्या उत्साहाने तलावा शेजारी व डोंगर माथ्यावरही हा उपक्रम राबविण्यात आला.

# मूल्यशिक्षण व वैयक्तिक स्वच्छता





जि.प. शाळा, प्राथमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा आणि ज्युनिअर कॉलेज येथिल मुला-मुलींना मूल्यशिक्षण विषयक व वैयक्तिक स्वच्छता यांची माहिती देऊन, रा.से.य़ो. स्वयंसेवकांच्या व तेथील शिक्षकांच्या मार्गदर्शनाने प्रत्येक वर्गात जाऊन मुलांकडून हात स्वच्छ धुण्याचे प्रात्यक्षिक दाखवले तसेच वैयक्तिक स्वच्छतेविषयी माहिती दिली.

# ***शाळा परीसर व्यवस्थापन***

शाळेतील झाडांना काऊ आणि चुना देऊन सुशोभिकरण करण्यात आले. कंपोस्ट खत तयार करण्यासाठी बांधकाम करून दिले.







# ग्राम विकास आराखडा व व्यवस्थापन





ग्राम विकास आराखडा व व्यवस्थापन स्वयंसेवकांना दोन - दोन च्या गटात विभागून गावातील विविध भागात, घराघरांत जाऊन सर्वांगीण ग्रामविकास आराखडा अर्ज भरून घेतला. यात गावातील सुखसुविधा, वीज, रस्ता, पाणी, स्वच्छतागृह, सांडपाणी, कचरा व्यवस्थापन वैयक्तिक माहिती, जणगणना, शिक्षण विषयक माहिती जमा करण्यात आली. सर्व अर्ज जमा करून सर्वेक्षणाचा एक सर्व साधारण पणे आराखडा तयार करण्यात आला.

# ***समारोप***

सरते शेवटी गावातील सरपंचाना शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला आणि संयोजकांनी आभार प्रदर्शन केले. मुलांनी सात दिवसा चा अनुभव गावचे सरपंच, उपचरपंच सदस्या समोर व्यक्त केले.

